**Daily SAKAL, Saturday, 15th July 2017**

# Free medical check-up of 2250 students in Mukul Madhav Foundation's Camp

Free health check-up of 2250 students in 5 schools was carried out in a camp organized by Mukul Madhav Foundation & Finolex Industries. This was the 19th free health check-up camp, which was held for 4 days. The check-up was done by Specialist doctors from Pune.

Mukul Madhav Foundation is working in the field of health problems of school students in and around Ratnagiri since last 9 years. As a part of this campaign, Mukul Madhav Foundation & Finolex Industries had organized health check-up camp at Swami Swaroopananda Vidyamandir, Pawas, Mukul Madhav Vidyalaya, Kolambe and ZP schools at village Mervi and Maingdewadi (Bhoke). In this camp doctors from H V Desai Eye Hospital, Qualia, Sasoon and KEM Hospital from Pune carried out the medical check-up of students. During the camp, some students are found having problems in hearing, eye-sight, heart problems, dental problems etc.

Mukul Madhav Foundation will follow up to get proper treatment to these students. Financial assistance, if needed, will also be provided. In addition, free spectacles will also be provided to the students having eye problems. The Headmasters and teachers of the schools have expressed satisfaction and thanked Mukul Madhav Foundation for organizing the health check-up camp.

A joint programme was held in which ZP Health Officer Dr Aniruddha Athalye, Education Officer Mr Amborkar, Media Officer Mr Shrikant Kulkarni, GM (HRD) of Finolex Industries Mr T K Kakade, Dr Ashutosh Mulye etc. were present. ZP Officers appreciated the drive of Mukul Madhav & Finolex.

दै. सकाळ, शनिवार दि. १५ जुलै २०१८.

# मुकुल माधव फाउंडेशनच्या शिबिरात २२५० विद्यार्थ्यांची मोफत तपासणी

सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. १४ : मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स इंटस्ट्रीजच्या वतीने पाच शाळांमधील २२५० विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तीन दिवस १९ वे मोफत आरोग्य शिबिर आयोजित केले होते. यामध्ये पुण्यातील तज्ज्ञ डॉक्टर्सनी तपासणी केली.

मुकुल माधव फाउंडेशन नऊ वर्षांपासून रत्नागिरी परिसरातील शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक समस्यांसंबंधी कार्यरत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजतर्फे पावस येथील स्वामी स्वरूपानंद विद्यामंदिर, कोळंबे येथील मुकुल माधव विद्यालय आणि जिल्हा परिषदेच्या मेर्वी, गोळप आणि माईंगडेवाडी (भोके) येथील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यामध्ये पुण्यातील एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल, कॉक्लिआ, ससून आणि केईएम हॉस्पिटल येथून आलेल्या



रत्नागिरी : मुकुल माधव फाउंडेशन व फिनोलेक्स इंडस्ट्रीजतर्फे आयोजित शिबिरात आरोग्य तपासणी करताना तज्ज्ञ डॉक्टर्स.

डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची संपूर्ण तपासणी केली. या तपासणीदरम्यान श्रवण, दृष्टिदोष, हृदयरोग, दंतरोग आदी आजार असणारे विद्यार्थी आढळून आले आहेत.

या विद्यार्थ्यांवर योग्य उपचार व्हावेत, यासाठी मुकुल माधव फाउंडेशन आवश्यक तो पाठपुरावा करणार आहे. गरजेनुसार आर्थिक मदतही देणार आहे. या शिवाय दृष्टिदोष असणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देणार आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी आणि शिक्षकांनी या आरोग्य तपासणीबद्दल समाधान व्यक्त केले आणि मुकुल माधव फाउंडेशनचे आभार मानले.

या तज्ज्ञ डॉक्टरांसमवेत संयुक्त कार्यक्रम झाला. त्या वेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये, माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर, माध्यम अधिकारी श्रीकांत कुलकर्णी तसेच फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनरल मॅनेजर (एचआर) टी. के. काकडे, डॉ. आशुतोष मुळ्ये आदी उपस्थित होते. फिनोलेक्सच्या या उपक्रमांचे कौतुक जिल्हा परिषदेच्या या अधिकाऱ्यांनी केले.

दै. पुण्यनगरी, शनिवार दि. १५ जुलै २०१७.

# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे आरोग्य शिबिर

**रत्नागिरी / वार्ताहर :**

मुकुल माधव फाऊंडेशन गेली नऊ वर्षे शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक समस्यांसंबंधी कार्यरत असून त्यासाठी पुणे येथील वैद्यकीय तज्ज्ञांच्या सहाय्याने आरोग्य शिबिरांचे आयोजन करते. याचाच एक भाग म्हणून मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रिज यांच्या संयुक्त विद्यमाने १० ते १३ जुलै या कालावधीत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

स्वामी स्वरूपानंद विद्यामंदिर, पावस, मुकुल माधव विद्यालय आणि जिल्हा परिषदेच्या मेर्वी, गोळप आणि माईंगडेवाडी (भोके) येथील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. पुणे येथील एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल, कॉक्लआ, ससून आणि केईएम हॉस्पिटल येथून आलेल्या डॉक्टरांनी २२५० विद्यार्थ्यांची संपूर्ण तपासणी केली. या तपासणीदरम्यान श्रवणदोष, दृष्टीदोष, हृदयरोग, दंतरोग इत्यादी आजार असणारे विद्यार्थी आढळून आले.

या विद्यार्थ्यांवर योग्य उपचार व्हावेत यासाठी मुकुल माधव फाऊंडेशन आवश्यक तो पाठपुरावा करणार आहे. गरजेनुसार आर्थिक मदतही उपलब्ध करून देणार आहे. याशिवाय दृष्टीदोष असणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत चष्मे उपलब्ध करून देणार आहे.



रत्नागिरी : आरोग्य शिबिरात विद्यार्थ्यांची तपासणी करताना तज्ज्ञ डॉक्टर्स.